# मुद्दा आहे जग बदलण्याचा, पण कसे?

## कुमार केतकर : जागतिक समस्यांवर शिबिरार्थ्यांशी चर्चा

दीपा देशमुख



शोधग्राम (जि. गडचिरोली) : 'कौशल्य' आत्मसात करताना शोधग्रामचा शिबिरार्थी. (सकाळ छायाचित्रसेवा)

शोधग्राम (जि.गडचिरोली), ता. ३ : डॉ. राणी बंग आणि अभय बंग वा 'सर्च' या संस्थेच्या पुढाकाराने शोधग्राम, गडचिरोली येथे सुरू असलेल्या निर्माण या शिबिराचा दोन जानेवारी हा चौथा दिवस. या शिबिरार्थ्यांनी सकाळी ७.३० वाजता कुडकवाई, सावरगाव, कुरखेड, चातगाव, खुर्सा, कटझरी, पांढरसडा आणि भालीटोला गावांकडे प्रयाण केले.

या आठ गावांत जाऊन त्यांनी त्या गावांची भौगोलिक स्थिती, हवामान, पिके, आरोग्य, शैक्षणिक स्थिती, पाणी आणि वीज यांची उपलब्धता, रोजगार यांसारख्या अनेक बाबींची माहिती घेतली. गावांतील लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. अवघ्या चार तासांत या युवांनी हे निरीक्षण केलं होतं. शिक्षणतज्ज्ञ डॉ. रमेश पानसे यांनी, हा एरियल सर्व्हे असून (फक्त वरवरचं निरीक्षण) तुम्ही केलंत. तुम्हाला गावाची ही तोंडओळख झाली असून, ही पहिली पायरी होती. आता यापुढे अनेक पायऱ्या अभ्यासल्या तर तुम्ही चांगले निरीक्षणार्थी होऊ शकता, असे सांगितले.

निरीक्षक हा परीक्षक किंवा विश्लेषक असता कामा नये. निरीक्षण करताना काय पथ्ये पाळायला हवे, याबाबत फार नेमके विवेचन त्यांनी केले. पाचवा दिवस म्हणजे ३ जानेवारी. लोकसत्ताचे संपादक कुमार केतकर यांचे अग्रलेख हे जगण्याचं नवं दर्शन घडवणारे. ते वास्तवातून सत्य शोधणारे असून, 'बदलतं विश्व', 'ज्वालामुखीच्या तोंडावर' सारखी अनेक पुस्तकं प्रकाशित; ग्रंथाली, दलित पँथर, युक्रांद, स्त्री मुक्ती संघटना यांसारख्या चळवळींचा भागीदार व एक ठाम भूमिका घेऊन बोलणारा कार्यकर्त्याची त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे.

कुमार केतकर यांनी निर्माणींशी संवाद साधला. आपण सर्वच जण परिवर्तन हवे किंवा समाजात बदल घडून आला पाहिजे, असं म्हणतो तेव्हा हा बदल कोण घडवणार आणि हे नवीन बदललेलं जग कसं असेल; आपल्याला कशा प्रकारचं जग हवंय, बदलेल्या जगास तपासायचे निकष काय असतील आणि त्यामध्ये खोलवर जाऊन विचार केल्यास माझ्यातले बदल कोणत्या गोष्टींमुळे होतात, होतील? सध्या जगभर 'कॉन्शसनेस'वर संशोधन चालू आहे. 'मी आणि माझ्यातले अनेक मी' यासंबंधी हे संशोधन आहे. हाच कॉन्शसनेस तुमच्यात बदल घडवण्यास कारणीभूत ठरतो का, आणि तोच पुढे जाऊन तुमची प्रतिमा, ओळख ठरवतो.

साम्यवाद, समाजवाद, प्रखर राष्ट्रवाद, दहशतवाद यांच्या व्याख्या आणि व्यवहार यांच्यातील भेद कुमार केतकर यांनी स्पष्ट करून सांगितला. २०४७ साली जग कसं असेल आणि कसं असावं, त्यात माझी भूमिका काय असेल, याविषयी सर्वच युवांनी विचारमंथन करून काही मुद्दे मांडून त्यावर गटात चर्चा केली. आज शोधग्राममध्ये निर्माणच्या शिबिरार्थ्यांसोबतच डॉ. कल्याणी देशमुख, सुप्रसिद्ध लेखक नंदा खरे, श्रीमती विद्यागौरी खरे, गडचिरोलीच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती किरण मुसळे, सामाजिक कार्यकर्ते सुबोध कुलकर्णी, आनंद ओक, डॉ. बंग, डॉ. राणी बंग आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्या 'बायफ' संस्थेचा प्रवास आणि रेशनपद्धतीवर सुरेश सावंत, मुंबई आणि 'बायफ'चे संचालक गिरीश सोहनी हे संवादक सत्र घेतील.